● मंगळवार, दि. १९ नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ११३ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनस्नेहता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# मत विभाजनाचा डाव हाणून पाडा- गोरंट्याल

## सर्वांगीण विकासासह दररोज पाणी देण्याचे आ. गोरंट्याल यांचे जालनेकरांना आश्वासन

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील जनतेला दररोज पाणी आणि सर्वांगीण विकासाची हमी हाच आपला आगामी काळातील संकल्प राहणार असल्याचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ.कैलास गोरंटयाल यांनी येथे बोलताना सांगितले.

जालना शहरातील गांधीनगर, भीमनगर, मंगळबाजार, नूतन वसाहत, कन्हैय्या नगर, चंदनझिरा, नॅशनल नगर, तट्पुरा, दुःखी नगर,अंबड रोड आदी भागात मविआचे उमेदवार आ. कैलास गोरंटयाल यांच्या प्रचारार्थ प्रचार सभा आयोजित करण्यात आल्या होत्या. या सभेत उपस्थित जनसमुदायाला मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

आ. गोरंटयाल म्हणाले की, तब्बल २० वर्षे आमदार आणि त्यातील दहा वर्षे राज्यमंत्री असतानाही ज्यांना मतदार संघाच्या विकासासाठी एकही ठोस काम करता आले नाही. ते विकासाच्या बाबतीत आपल्यावर टीका करत आहेत. जायकवाडी योजनेद्वारे जालना शहराला पाणीपुरवठा आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ही दोन ठोस मोठी काम आपण आपल्या कारकीर्दीत केली असून, ग्रामीण भागात बहुतांश गावांत रस्ते, समाज मंदिर, पाणी पुरवठा योजना, आरोग्य, शिक्षण या क्षेत्रांत अशी कितीतरी अधिक पटीने विकासाची कामे आपण पूर्ण केली असून, शहरातील प्रमुख रस्त्यांची कामे, प्रभागांतर्गत रस्ते, अंतर्गत जलवाहिनी यासह अनेक विकासाची कामे मार्गी लावली आहेत. आणि ही सर्व कामे जनतेसमोर असल्याने या निवडणुकीत जनतेचे पाठबळ आणि आशीर्वाद यामुळे आपला विजय निश्चित असल्याचा ठाम विश्वास उमेदवार आ. कैलास गोरंटयाल यांनी व्यक्त केला आहे.

अंबड येथील जलशुद्धीकरण केंद्रात जल शुद्धीकरणाची क्षमता वाढविण्यासाठी काम सुरू आहे. तसेच घाणेवाडी येथील संत गाडगेबाबा जलाशय ते शहरातील जुन्या एम आयडीसी भागात असलेल्या जलशुद्धीकरण केंद्र ही निकामी झालेली जलवाहिनी बदलण्याचे काम लवकरच पूर्ण झाल्यानंतर आगामी काळात जालना शहरातील जनतेला दररोज पाणी पुरवठा आणि सर्वांगीण विकास तसेच एखादे विद्यापीठ जालन्यात मंजूर करण्याचा प्रयत्न आपला राहील अशी ग्वाही आ. गोरंट्याल यांनी दिली. उपरोक्त सर्वच भागांमध्ये आयोजित सभांना हजारो महिला, पुरुष, युवक कार्यकर्ते उपस्थीत होते. ढोलताशा, फटाक्यांची आतषबाजी आणि फुलांची उधळण करत आ. गोरंटयाल यांच्यासह अन्य उपस्थीत मान्यवरांचे जंगी स्वागत करण्यात आले.

काही उमेदवार हे केवळ मतांचे विभाजन करण्याच्या हेतूने निवडणूक लढवत असून, अशा उमेदवारांना जागरुक मतदारांनी ओळखले आहे. त्यामुळे मतांचे विभाजन करण्याचा आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवाराचा डाव मतदार निश्चितपणे हाणून पाडणार असल्याचा विश्वास उमेदवार आ. कैलास गोरंटयाल यांनी व्यक्त केला.




युवा आदर्श

मतदानाधि ...

पोचवले दिले शब्दां
अस्थीठेवे बास्तनात
अंघोळ आपले नावे
मोकळे हो अपस्नात
कशी होई मेहरबानी
किती करालं अनात
स्वागत आगत सज्ज
बांधून ठेवली कनात
येईल कधी ओठावर
साठवून ठेवले मनात
लाजरा असे स्वभाव
केवळ बोले कानात
पंगती छान सजल्या
आश्वासने ती पानात
खुशीत नाचवे झोळी
रे फेकलेल्या दानात
नाचलो आनंदभरात
करे त्यांचे सन्मानात
जाता त्यांच्या दारात
भर पडते अपमानात
अवतार बने कर्णाचा
देतीलं सोन्याचे दात
निवडून आल्या वरती
घालतील घशात दात

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

# आजी ना माजी जनतेच्या आशिर्वादाने मारणार आपणच बाजी - अब्दुल हाफिज

**जालना । प्रतिनिधी -** आजी-माजी लोकप्रतिनिधींनी स्वतःच्या राजकिय स्वार्थासाठी तब्बल ३५ वर्षे समाजा-समाजात तेढ निर्माण करण्याचे काम केले आहे. त्यांचा हे उद्योग जालनेकरांनी ओळखले असून, सर्व जाती-धर्माच्या समाजबांधवांनी पूर्ण ताकदीनिशी आपणांस निवडून देण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे जालन्यात बदल अटळ असून, ना-आजी ना-माजी, आता जनता-जनार्दनाच्या आशीर्वादाने आपणच मारणार बाजी, असा ठाम विश्वास जालना विधानसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार पत्रकार अब्दुल हाफिज यांनी व्यक्त केला आहे.

जालना शहरातील सिटी चौक भागात आयोजित करण्यात आलेल्या प्रचंड जाहीर सभेत अपक्ष उमेदवार अब्दुल हाफिज बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ऑल इंडिया मुस्लिम-ओबीसी ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर अन्सारी, ज्येष्ठ नेते अब्दुल रशीद पहेलवान, अहमद बिन सईद चाऊस, शेख माजेद, मौलाना जमील, विलास डोळसे, मौलाना रईस, माजी नगरसेवक इनायतखान मामु, कामरान खान, युसूफ निजामी आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना उमेदवार अब्दुल हाफिज म्हणाले की, गेल्या ३५ वर्षाच्या राजकिय, सामाजिक जीवनात आपण कधीही जाती-पातीचे राजकारण न करता सर्वांच्या मदतीला निःस्वार्थीपणे धावून जाण्याचे काम केले आहे. त्यामुळे जालना शहरातील हिंदू-मुस्लिम धर्मीयांसह सर्वच जाती-धर्मातील नागरिक आपल्याला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत असून, निवडून आणण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी आजी-माजी आमदार समाजा-समाजात तेढ निर्माण करून भांडणे लावण्याचा उद्योग करीत आहेत. त्यांच्या घाणेरड्या राजकारणामुळे शहरवासीयांना १५ दिवसांआड पाणी मिळत आहे. शहरात रस्ते नाहीत, दिवाबत्ती नाही, केवळ ही मंडळी विकासाच्या वलग्ना करून, जनतेची दिशाभूल करीत आहेत. व्यापाऱ्यांचे शहर म्हणून ओळख असलेल्या या शहरातील व्यापाऱ्यांना सुविधा तर दिल्याचं नाही, मात्र आजी-माजी लोकप्रतिनिधींनी त्यांचा भयानक छळ केला. जालना शहरातील सर्वसामान्य नागरिकांबरोबरच इथला व्यापारी वर्ग सुरक्षित नाही. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या फुले मार्केटला उध्वस्त करून काही लोकांच्या हितासाठी व्यापाऱ्यांना रस्त्यावर आणल्या गेले आहे. हे व्यापारी अजूनही विसरलेले नाहीत. आपण निवडून आल्यानंतर जालन्यातील व्यापाऱ्यांना सुरक्षितता देऊन, महात्मा फुले मार्केट उभारण्यासाठी तातडीने प्रयत्न करू, अशी हमी अब्दुल हाफिज यांनी यावेळी दिली.



जालना शहर आणि मतदार संघातून आपल्याला सर्वच स्तरातील समाजबांधवांकडून उत्स्फूर्तपणे पाठींबा मिळत असल्यामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकत आहे. मतदारांची दिशाभूल करण्याचे काम केल्या जात आहे. त्यामुळे मतदारांनी कोणत्याही भूलथापांना बळी न पडता माझ्यावर विश्वास ठेवून मला भरघोस मतांनी निवडून द्यावे, असे आवाहन अब्दुल हाफिज यांनी यावेळी केले आहे.

यावेळी आपल्या पान २ वर

# युतीचे सरकार आल्यास शेतकऱ्यांना कर्जमाफी - अर्जुनराव खोतकर

**जालना । प्रतिनिधी -** राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आल्यावर शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी दिली जाणार आहे. तसेच महिला, युवक, विद्यार्थी, अपंग व गोरगरिबांसाठीच्या लाभाच्या योजनांमध्ये जास्तीची आर्थिक तरतूद करून ताकदीने राबविल्या जातील, अशी ग्वाही महायुतीचे उमेदवार श्री. अर्जुनराव खोतकर यांनी दिली. आज देवमूर्ती, रामनगर (साखर कारखाना), मधुबन कॉलनी, डबल जिन, सिंगल जीन आदी विविध ठिकाणी भेटी दिल्या. श्री. खोतकर म्हणाले की, आपल्या प्रमुख प्रतिस्पर्धी उमेदवाराने निवडणूक अंतिम चरणात आली तरी आरोप करण्यापलीकडे काहीही केलेले नाही. आमच्या महायुतीची शहरात महारॅली आणि मुख्यमंत्र्यांची विराट सभा झाली. माझ्या जीवनातील पहिल्या निवडणुकीत माझा पहिला मोठा विजय



झाला होता. सध्याचे चित्रही तसेच असून लोकांनीच ही निवडणूक हातात घेतली आहे. महायुतीचे नेते रावसाहेब पाटील दानवे, माजी आमदार अरविंदराव चव्हाण, रिपाईचे नेते ऍड. ब्रह्मानंद चव्हाण, भास्करराव दानवे, बद्रीनाथ पठाडे, यांच्यासह युतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आपल्या विजयासाठी झटत आहेत. विविध सामाजिक संघटनांनी आपल्याला पाठिंबा दिला आहे. महिला वर्गातून मिळत असलेला प्रतिसाद अभूतपूर्व आहे. आपण ठिकठिकाणी लोकांना ग्वाही देत आहोत की, युतीचे सरकार पान २ वर

# अवैध मद्यासह ४० लाखांचा मुद्देमाल जप्त

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू झाल्यापासुन (दि. १५/१०/२०२४ ते दि.. १७/११/२०२४ या कालावधीमध्ये) राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या एकुण ४ पथकांनी केलेल्या कारवाईमध्ये एकुण १७२ गुन्हे नोंदकेले असुन त्यात १५२ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. त्यात एकुण रु.३९,८१,९३५/- चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच एकुण ८ वाहने जप्त करण्यात आलेली आहेत. निवडणूक कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणवर अवैध मद्य वाहतूक होण्याची शक्यता असल्याने त्यावर आळा घालण्यासाठी या विभागाने विशेष लक्ष दिले आहे. त्यानुसार वाहन तपासणी करणे, संशयीत ठिकाणांवर छापे टाकणे व रात्रीच्या वेळी गस्त घालणे अशी कारवाई करण्यात येत आहे. तसेच ढाब्यांवर होणाऱ्या अवैध मद्यविक्रीवर सुध्दा विभाग लक्ष ठेवून आहे.. तसेच कलम-९३ अंतर्गत सराईत गुन्हेगारांकडून चांगल्या वर्तणूकीबाबतचे बंधपत्र घेण्यासाठी संबंधीत प्रातांधिकारी यांना एकुण ६० प्रस्ताव सादर करण्यात असून त्यापैकी ११,00000/- किंमतीचे २२ बंधपत्र घेण्यात आले आहेत. निवडणूक कालावधीमध्ये सदर बंधपत्राचा भंग केल्यास संबंधीत गुन्हेगारावर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. आचारसंहिता पान २ वर

# शिंदे, फडणवीस, अजित यांना घरीच पाठवा

फडणवीस यांची किळसवाणी राजकीय चाणक्यनीती,पुन्हा मुख्यमंत्री होण्याचा अहंकाराला भाजपनेच सुरुंग लावला.अहंकारी फडणवीस ह्यांची काळ्या कृतीची,भ्रष्टाचाराची फाईल नक्कीच पक्ष श्रेष्टींकडे असावी म्हणून त्यांना जाब न विचारता मनाविरुद्ध आदेशाचे पालन केले. शिंदे सत्तेची हाव म्हणा किंवा भाजपने उद्धव ठाकरे वर सूड उगवण्याचा घेतलेला निर्णय त्या अनुषंगाने एकनाथ शिंदे याना दिलेली ईडीची धमकी ह्याचा परिणाम शिंदेनी आपल्याच पक्षाच्या पाठीत खंजीर खुपसून भाजपाच्या कुटील डावांना खतपाणी घातले.सरड्यासारखे रंग बदलले आणि महाविकास आघाडीला सत्तेतून पायउतार व्हावे लागले. शिंदे कोण होते, काय होते, त्यांना कोणी मोठे केले ह्याची जाण शिंदेनी ठेवली नाही. शिंदे यांनी केलेल्या पक्ष गद्दारीची चर्चा तेहतीस देशात केली गेली आणि त्याचा शिंदे यांना गर्व, अभिमान वाटत असला तरी ज्या पक्षाने आपल्याला खालून उचलून लायकीप्रमाणे राजगादीवर बसवले.शिवसेनेचा शिवसैनिक हा कट्टर शिवसैनिक म्हणून ख्याती आहे त्या कट्टर शब्दालाच शिंदे यांनी कलंक लावला. नतद्रष्ट अजित पवार हे शरद पवारांच्या आशीर्वादाने राजकारणात आपले स्थान भक्कम केले. अतिशय फटकळ स्वभावाच्या, तितक्याच अहंकाराने कोणाचाही राजकीय वेध घेणारा चतुर चाणक्य नेता सिंचन घोटाळा करून राज्याला सत्तेत हजार कोटीला बुडवले त्याची वाच्यता देशाचे सतत खोटे बोल पण रेटून बोल अशी ज्यांची ख्याती आहे असे दुर्दैवाने देशाला लाभलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर सभेत चक्क निर्भत्सना केली अश्या महाराष्ट्राच्या लुटारूला सत्तेचा भागीदार करून राजकारणाची पातळी पार रसातळाला नेवून ठेवली. मोदीजी ओढून ताणून तिसऱ्यांदा पंतप्रधान होतात हि जनतेने त्यांना निवडून आणून लोकशाहीची थट्टाच केली.



फडणवीस, शिंदे, अजित पवार ह्यांच्या ह्या किळसवाण्या राक्षसी राजकीय महत्वकांक्षेमुळे सुसंकृत, प्रतिष्ठित, पुरोगामी महाराष्ट्राची देशभरात नाही तर जगभर नाचक्की झाली.ज्या मातीत जन्म घेतला त्याच मातीला कलंकित केले अश्या महाराष्ट्रद्रोही फडणवीस शिंदे अजित पवार ह्यांना त्यांच्याच मतदार संघात मतदारांनी पराभवाची धूळ चारली पाहिजे.तिघांनी उत्कृष्ट काम काम करून आपला मतदारसंघ नक्कीच बांधून ठेवला असणार ह्यात शंका नाही त्यांना पाडणे कोणत्याच उमेदवाराला शक्य नाही हे हि खरे.त्यांनी ज्या काही सामाजिक राजकीय,धार्मिक सुधारणा केल्या ते त्यांचे कर्तव्य होते त्याचा त्यांना भक्कम मोबदला मिळत होता.तरी त्यांनी मोठा भ्रष्टाचार करून जनतेच्या पैशाची लूटच केली आहे.त्यांनी काही जनतेवर उपकार केले नाहीत.ह्यासाठी फडणवीस शिंदे अजित पवार ह्यांच्या मतदार संघातील मतदारांनी ह्या महाराष्ट्र लुटणाऱ्या,बदनाम करणाऱ्या,महाराष्ट्राची जगभरात बेअब्रू करणाऱ्या ह्या तिन्ही नेत्यांना मतदारांनी महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेतेसाठी येणाऱ्या निवडणुकीत पराभूत करावे कि जेणेकरून भविष्यात कोणी हिम्मत करणार नाही.जर त्यांना जिंकून येण्यात मदत केली तर संपूर्ण मतदार संघ हा महाराष्ट्र द्रोही असेच म्हणावे लागेल.माझ्या ह्या विचारांशी महाराष्ट्रातील कोट्यवधी जनता सहमत असेल.

**यशवंत चव्हाण, सीबीडी बेलापूर.**

## जालन्यातील 'स्मोकिंग किल्स' शॉर्ट फिल्मची झुमा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी निवड




**जालना -** जालन्यातील स्लम फिल्म्स प्रॉडक्शन निर्मित आणि अभिजीत दगडूजी चव्हाण दिग्दर्शित शॉर्ट फिल्म स्मोकिंग किल्सची (Smoking Kills) नायजेरिया येथील प्रतिष्ठित झुमा इंटरनॅशनल फिल्म फस्टिव्हल २०२४ साठी निवड झाली आहे.

या चित्रपटात प्रमुख भूमिका सुमीत शर्मा आणि सुनील गावणे यांनी साकारली असून, बालकलाकार म्हणून रणवीर डांगे झळकला आहे. रणवीर हा आंतरराष्ट्रीय बॉडीबिल्डर किशोर डांगे यांचा मुलगा आहे. आता त्यांच्या मुलाने चित्रपटसृष्टीत यश मिळवत जालन्याचे नाव अभिमानाने उंचावले आहे.

अभिजीत चव्हाण हे केमिकल इंजिनिअर असून त्यांनी स्मोकिंग किल्स या शॉर्ट फिल्मचे दिग्दर्शन केले आहे. चव्हाण हे पूर्णवेळ फिल्ममेकर म्हणून काम करतात. यापूर्वी त्यांची शॉर्ट फिल्म 'दानपत्र' देखील अनेक फिल्म फेस्टिव्हलमध्ये दाखवण्यात आली होती. विशेषतः तिची निवड युकेतील एका फिल्म फस्टिव्हलसाठी झाली होती.

'स्मोकिंग किल्स' ही फिल्म धूम्रपानाच्या दुष्परिणामांवर भाष्य करणारी आहे. अभिजीत चव्हाण यांची कथा मांडण्याची शैली व सामाजिक विषयांवरील जाण यामुळे त्यांना जागतिक स्तरावर मान्यता मिळत आहे. झुमा इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये निवड झाल्यामुळे जालना शहराचे नाव पुन्हा एकदा जागतिक पातळीवर उंचावले आहे. 'स्मोकिंग किल्स' ही फिल्म २०२४ च्या झुमा फिल्म फस्टिव्हलमध्ये प्रदर्शित होत असल्याबद्दल अभिजीत चव्हाण, सुमीत शर्मा, सुनील गावणे, रणवीर डांगे आणि त्यांच्या टीमचे जालनेकरांच्या वतीने अभिनंदन होत आहे.

## 'धर्मरक्षक महावीर छत्रपती संभाजी महाराज' २२ नोव्हेंबरला प्रदर्शित होणार

राष्ट्रीय वीर आणि हिंदवी स्वराज्याचे रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित 'धर्मरक्षक महावीर छत्रपती संभाजी महाराज भाग १' या चित्रपटाचा भव्य ट्रेलर मुंबईत लाँच करण्यात आला. हिंदी आणि मराठीत एकाच वेळी प्रदर्शित होत असलेल्या या भव्य चित्रपटाच्या ट्रेलरचे अनावरण कमांडो २ फेम ठाकूर अनुप सिंग, किशोरी शहाणे, भार्गवी चिरमुले, अमृता खानविलकर यांच्यासह बॉलीवूड चित्रपट निर्माते जयंतीलाल गडा या विशेष पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. उर्विता प्रॉडक्शनच्या बॅनरखाली संदीप रघुनाथराव मोहिते-पाटील निर्मित 'धर्मरक्षक महावीर छत्रपती संभाजी महाराज' या चित्रपटाचे दिग्दर्शक तुषार विजयराव शेलार आहेत.

क्शन आणि शौर्याने परिपूर्ण असलेला ट्रेलर प्रेक्षकांसाठी एक उत्तम व्हिज्युअल ट्रीट आहे. त्याचे भव्य चित्रीकरण आणि सादरीकरण या चित्राला ऐतिहासिक स्वरूप देत आहे. जंगलात मोजकेच सिंह आहेत, पण तेच जंगलावर राज्य करतात. या धमाकेदार संवादाने ट्रेलरची सुरुवात होते. घोडे आणि तलवारींसह युद्धाचे भयानक दृश्य दिसते. काय क्शन, काय सेट दिसतोय, काय अप्रतिम तऋद्द. संपूर्ण प्रेक्षकांसाठी एक महाकाव्य. या धाडसी दृश्यांच्या पार्श्वभूमीवर 'शेर संभाजी हमारे' चित्रपटाचे शीर्षकगीत वाजत आहे जे ऊर्जा आणि धैर्याने परिपूर्ण आहे. हे शीर्षकगीत रिलीज झाल्यानंतर आधीच लोकप्रिय झाले आहे.



छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य आणि बलिदानाची गाथा मांडणारा हा चित्रपट हिंदी आणि मराठी अशा दोन्ही भाषांमध्ये २२ नोव्हेंबरला देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

ठाकूर अनूप सिंग छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारण्यासाठी खूप उत्सुक आहेत. छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारण्याचे भाग्य मला मिळाले ही माझ्यासाठी खूप अभिमानाची गोष्ट आहे, त्याबद्दल मी या चित्राच्या निर्मात्याचे आणि दिग्दर्शकाचे आभार मानतो, असे ते म्हणाले. त्याचा ट्रेलर रिलीज होताच इतका चांगला प्रतिसाद मिळत आहे याचा मला खूप आनंद आहे. अजून एक चित्र बाकी आहे, ती फक्त एक झलक आहे. आपण सर्वांनी खूप मेहनत आणि झोकून देऊन हा चित्रपट बनवला आहे, अशी भूमिका अभिनेत्याला आयुष्यात एकदाच मिळते. छत्रपती संभाजी महाराजांचे साहसी व्यक्तिमत्व रुपेरी पडद्यावर सादर करणे हा अभिमानाचा क्षण आहे. 'शेर संभाजी हमारे' या चित्रपटाचा टायटल ट्रॅकही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला असून, हे गाणेही माझ्या हृदयाच्या जवळ आहे.

ठाकूर अनुप सिंग, अमृता खानविलकर, किशोरी शहाणे, भार्गवी चिरमुले, राज झुत्शी, प्रदीप रावत, कामेश सावंत या कलाकारांनी चित्रपटात काम केले आहे.




पान १ व ४ वरुन

## आजी ना माजी ...

भाषणातून ऑल इंडिया मुस्लिम- ओबीसी ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर अन्सारी म्हणाले, अब्दुल हाफिज यांना सर्व समाजातील प्रश्नांची जाण असून, ते प्रश्न शासन दरबारी कसे सोडवून घ्यायचेत, याचा त्यांना अभ्यास आहे. त्यामुळे अब्दुल हाफिज यांना निवडून दिल्यास जालना शहराचा ३५ वर्षांचा विकासाचा अनुशेष भरून निघून सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल, असा दावा केला. यावेळी अब्दुल रशीद पहेलवान, विलास डोळसे, शेख माजेद, जमील मौलाना आदींनी आपल्या भाषणातून मतदारांनी कोणत्याही अफवावर विश्वास न ठेवता अब्दुल हाफिज यांनाच निवडून द्यावे, असे आवाहन केले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शेख माजेद यांनी केले.

## युतीचे सरकार ...

आल्यानंतर शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी दिली जाईल. तसेच सध्या सुरू असलेल्या गोरगरिबांसाठीच्या लाभाच्या योजना जास्तीची आर्थिक तरतूद करून ताकदीने राबविल्या जातील. सत्ता पदावर नसतानाही आपण सुमारे चारशे कोटी रुपयांचा निधी मतदार संघात आणला आहे. त्यामुळे लोकांचा आपल्यावर ठाम विश्वास व्यक्त होत आहे. आणि मुख्यमंत्र्यांनी या जालना मतदारसंघासाठी एक हजार कोटी रुपये देउन अनुशेष भरून काढण्याची ग्वाही दिल्यामुळे हा मतदारसंघ समृद्ध आणि विकासाचे मॉडेल बनणार आहे, त्यामुळे जनता जनार्दनाच्या जाणतेपणामुळे आणि आशीर्वादामुळे माझा विक्रमी मतांनी विजयी होणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेष आहे. मतदारांनी कोणत्याही अफवांना बळी न पडता २० नोव्हेंबरला धनुष्यबाणावर बटन दाबून आपल्याला विजयी करावे असे नम्र आवाहन श्री. खोतकर यांनी केले आहे.

**अर्जुन खोतकर यांना निवडून द्या - भास्कर दानवे**

राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा आणायचे असेल तर मोठ्या संख्येने आमदार निवडून द्यावे लागतील. त्यासाठी जालना मतदारसंघातून महायुतीचे अधिकृत उमेदवार आणि विकासाभिमुख नेतृत्व अर्जुनराव खोतकर यांनाच निवडून द्या, असे आवाहन भाजपचे उपाध्यक्ष भास्करआबा दानवे यांनी केले आहे. कार्यकर्त्यांनी आणि नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता अर्जुनभाऊंना प्रचंड मतांनी विजयी करावे, असेही दानवे यांनी म्हटले आहे.

**सुसंस्कृत नेतृत्वालाच पसंती द्या - अरविंदराव चव्हाण**

महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुनराव खोतकर हे विकासासाठी सक्षम नेतृत्व आहे. आपल्या हक्काचा माणूस आहे. आणि मुख्य म्हणजे निर्व्यसनी आध्यात्मिक आणि सुसंस्कृत व्यक्तिमत्व आहे. त्यामुळे अर्जुनभाऊनाच निवडून द्या, असे आवाहन अरविंदराव चव्हाण यांनी केले आहे.

**शोषित पिडीताना न्याय देणारा नेता - ब्रह्मानंद चव्हाण**

अर्जुन खोतकर हे गोरगरीब, शोषित, पीडित, वंचित लोकांसाठी मोठा आधार आहेत. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांसह गोरगरीब, शोषित, पीडित वंचितांनी अर्जुनभाऊंनाच मतदान करावे असे आवाहन एड .ब्रह्मानंद चव्हाण यांनी केले आहे..

## अवैध मद्यासह ...

कालावधीमध्ये मद्यविक्री अनुज्ञप्त्या विहीत वेळेत उघडणे व बंद करणे यावर क्षेत्रीय अधिकारी विशेष लक्ष ठेवून आहेत. या नियमांचे उल्लघन करणाऱ्या अनुज्ञप्तींवर निलंबनाची कारवाई करण्याबाबतचे निर्देश आहेत. अनुज्ञप्तीधारकांडून कुठल्याही प्रकारचा गैरव्यवहार होणार नाही व कायद्यातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन होत आहे किंवा कसे? याबाबत तपासणी करण्यासाठी सर्व निरीक्षक व दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्या मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रात अनुज्ञप्तींचे सखोल निरीक्षणाच्या विशेष मोहिम राबविण्यात आल्या आहेत.

## तक्रारीसाठी सीव्हीजील ...

ओळखपत्रात बदल किंवा स्थलातंर झाले असल्यास, मतदान यादीत नाव नोंदवायचे असल्यास काय करावे याबाबत मार्गदर्शन, मतदान ओळखपत्र व मतदान अर्ज निगडीत सर्व माहिती, या हेल्पलाईनच्या सहाय्याने मतदार नोंदणीसाठी संबधितांना अधिकृत माहिती मिळविणे सोपे झाले आहे. मतदार यादीतील त्यांच्या वैयक्तिक माहितीचे तपशील, मतदान केंद्र बुथ लेव्हल अधिकारी यांचे संपर्क क्रमांक या विषयीची माहिती १९५० या हेल्पलाईनवर फोन करुन मिळविता येईल. तसेच या क्रमांकावर प्राप्त होणाऱ्या निवडणुक विषयक तक्रारीची दखल देखील घेण्यात येत आहे. असे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा नोडल अधिकारी (खर्च), जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# प्रचाराचा समारोप; सतीश घाटगेंनी मतदारसंघ ढवळून काढला

## कुंभार पिंपळगाव, धाकलगाव येथील सभेत जनतेचा प्रतिसाद

**घनसावंगी । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणुकीच्या प्रचार तोफा सोमवारी सायंकाळी पाच वाजता थंडावल्या. यात सतीश घाटगे पाटील यांच्या प्रचाराचा समारोप जनतेच्या विशाल जनुसमदायाच्या उपस्थितीत झाला. या सभा सतीश घाटगे पाटील यांच्या विजयासाठी निर्णायक ठरणार असून या सभेत सर्व जनतेने परिवर्तनाचा आणि सतीश घाटगे यांच्या विजयाचा कौल देण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

घनसावंगी विधानसभा निवडणुकीत ४ तारखेपासून प्रमुख उमेदवारांच्या प्रचाराने संपूर्ण मतदारसंघ ढवळून निघाल्या. ही निवडणूक आरोप प्रत्यारोपाने कापली गेली.

या रणधुमाळीत सतीश घाटगे यांनी प्रमुख राजकीय पक्षांना मागे टाकत प्रचारात आघाडी घेतली. शेवटच्या दिवशी देखील सतीश घाटगे यांना घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील जनतेने निर्णायक कौल दिला. त्यांच्या उपस्थितीत सोमवारी सकाळी कुंभार पिंपळगाव येथे प्रचार रॅली निघाली. या प्रचार रॅलीत हजारोच्या संख्येने जमलेल्या जनसमुदायाने सतीश घाटगे यांना एकमुखी पाठिंबा दिला.



धाकलगावात प्रचार सभेवेळीं मुस्लिम बांधव नमाज अदा करण्यासाठी मस्जिद मध्ये आले होते. मस्जिद मधून अजाण सुरू होताच सतीश घाटगे यांनी आपले भाषण थांबवून मुस्लिम बांधवांच्या धर्माचा आणि श्रध्देचा आदर केला. नमाज अदा झाल्यानंतर त्यांनी भाषण सुरू केले.

संपूर्ण प्रचार दौऱ्यात सतीश घाटगे यांनी जनतेचे प्रश्न आणि समस्या यावर जनतेमध्ये जनजागृती केली २५ वर्षापासून प्रलंबित असलेल्या प्रश्न सोडवण्याचा शब्द दिला तसेच घनसावंगी विधानसभा मतदारसंघासाठी असलेले सर्व समाज प्रचाराच्या शेवटच्या दिवशी त्यांनी जनतेला कळकळीचा आव्हान केलं की फक्त थोड्याशा पैशासाठी गावाचा विकास विकू नका तुमचा स्वाभिमान जिवंत ठेवा आपल्या पुढच्या पिढीच्या भविष्यासाठी आपल्या मतदानाचा वापर करा असे आवाहन त्यांनी केले.

---

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४

# आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही याकरीता योग्य कार्यवाही करावी -जिल्हा निवडणूक अधिकारी



**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात मतदानाच्या अनुषंगाने सर्व पूर्वतयारी झाली असून, मतदानपूर्व काळात आदर्श आचारसंहितेचे पालन करुन उल्लंघन होणार नाही याकरीता सर्व यंत्रणांनी योग्य नियोजन करत कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात मतदानपूर्व ७२ तासात करण्यात येणाऱ्या कारवाईच्या अनुषंगाने कायदा सुव्यवस्था विषयक आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी निवडणूक निरीक्षक (सामान्य) वेद पती मिश्र आणि श्री. नवीन, निवडणूक निरीक्षक (पोलीस) झेड न विजया, निवडणूक निरीक्षक (खर्च) देव प्रकाश बमनावत, जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पोलीस अधिक्षक अजयकुमार बसंल, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रवार, अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, उप जिल्हा निवडणुक अधिकारी शशिकांत हदगल, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. पांचाळ म्हणाले की, मतदानापूर्वीचे शेवटचे ७२ तास आणि ४८ तास या कालावधीत भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आदर्श आचारसंहितेचे कोटकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. वेबकास्टींगद्वारे नियंत्रण ठेवावे, तसेच कुठेही अनियमितता होवू नये. स्थिर, फिरत्या पथकांची कार्यवाही सुरु ठेवाव्यात. आचारसंहितेचे उल्लंघन होता कामा नये. मद्य विक्री बंद करण्याचे आदेश देण्यात यावे. तसेच शेवटच्या कालावधीत प्रचारा दरम्यान आचारसंहितेचे उल्लंघन रोखण्यासाठी विशेष लक्ष देवून जबाबदारी पार पाडावी. कुठेही जाहिर प्रचार सुरू राहता कामा नये. भरारी पथकांनी चांगल्या प्रकारे सनियंत्रण करून अशा प्रचारावर बारीक लक्ष ठेवा. स्थिर पथकांनीही चांगल्या प्रकारे सतर्क राहून काम करावे करण्याच्या सूचना श्री. पांचाळ यांनी यावेळी दिल्या.

मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसरात उमेदवारांचे निवडणूक बूथ उभारण्यात येऊ नयेत. निवडणूक बूथ उभारण्याकरिता निवडणूक निर्णय अधिकारी, आवश्यकते नुसार शासकीय प्राधिकरणे तसेच स्थानिक प्राधिकरणे यांच्या परवानग्या घेणे आवश्यक राहिल. निवडणूक बूथ उभारल्यामुळे सार्वजनिक किंवा खाजगी मालमत्तेचे अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घ्यावी. बूथ धार्मिक जागेमध्ये किंवा परिसरात उभारण्यात येऊ नये. निवडणूक बूथ शैक्षणिक संस्था किंवा रुग्णालयाच्या परिसरात उभारण्यात येऊ नये. अशा निवडणूक बूथवर पक्षाचा ध्वज आणि पक्षाचे चिन्ह लावता येणार नाही असेही श्री. पांचाळ यांनी यावेळी सांगितले.

निवडणूक बूथवर उपस्थित व्यक्तींकडून मतदानाकरिता येणाऱ्या मतदारांना कोणताही अडथळा किंवा प्रभाव होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. मतदान केंद्रापासून २०० मिटर परिसरात कोणताही प्रचार करता येणार नाही. यावेळी पोलीस अधिक्षक अजयकुमार बसंल यांनी कायदा व सुव्यावस्था विषयक केलेल्या पूर्वतयारीचा अहवाल सादर केला.

---

# २५ किलो गांजा जप्त

## गुन्हे शाखा ३ कल्याण पोलीसांची कारवाई



**कल्याण । प्रतिनिधी -** गुन्हे शाखा, घटक-0३ कल्याण कडील पोशि/७६३७ मिथुन राठोड यांना दिनांक ११/११/२०२४ रोजी त्यांचे गुप्त बातमीदार कडुन माहिती मिळाली की, काही इसम मोठया प्रमाणात गांजा या अंमली पदार्थाची विक्री करण्याकरीता कोळशेवाडी पोलीस ठाणे हददीत विठलवाडी स्टेशनच्या बाहेर येणार आहेत. वरीलप्रमाणे मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने गुन्हे शाखा, घटक-३, कल्याण चे पोलीस अधिकारी व अमंलदार विठलवाडी स्टेशनबाहेर पुना लिंक रोड परिसरात सापळा लावुन थांबले होते.

त्यांनतर काही वेळाने तीन इसम आपल्या जवळ दोन प्रवाशी बॅगा घेवुन श्रीराम चौकातुन प्रवासी रिश्क्षामधुन उतरून अपर्णा डेअरीकडे येत असताना दिसले. त्यांनतर गुन्हे शाखा, घटक-0३ कल्याणचे पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी सापळा कारवाई करून सदर इसमाना ताब्यात घेतले. त्याचेकडे अधिक विचारपुस करता त्यांनी त्यांची नावे १) गणेश विवेक जमखंडी वय २६ वर्षे रा. विनायक कॉलनी चाळनं. १५, रूम नं. 0१, नवीन ओंकार सोसायटी, सत्यम बार जवळ, खडेगोलवली कल्याण पुर्व २) अमीर सलीम शेख वय २८ वर्षे रा. जय अंबे कॉलनी, रूम नं. 0६, ईबाबा मदिंर जवळ, खडेगोलवली कोळशेवाडी कल्याण पुर्व ३) राज रवि पटेल वय २६ वर्षे रा. लक्ष्मी पुनम अपार्टमेंट रूम नं. ४0१, श्रीराम टॉकीजवळ, सरगम गल्ली खडेगोलवली, कल्याण पुर्व असे असल्याचे सांगितले. त्यांनतर पोलीस पथकाने त्यांचेकडे मिळुन आलेल्या दोन प्रवाशी बॅगाची झडती घेतली असता त्यामध्ये एकुण २४ किलो ९६२ ग्रॅम वजनाचा ५,२0,000/- रू किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आला. नमुद इसमाना अधिक विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी सदरचा गांजा हा अमंली पदार्थ ओडीसा या राज्यातुन विकत घेवुन तो कल्याण व उल्हासनगर परिसरात विक्री करीता घेवुन आले असल्याचे सांगितले. म्हणुन वरील तीन्ही इसमाविरूध्द कोळशेवाडी पोलीस ठाणे गु.र.नं. १0८३/२0२४ एनडीपीएस ॲक्ट कलम ८ (क), २0(ब), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांनतर नमुद गुन्हयाचा पुढील तपास मा. वरिष्ठांच्या आदेशानुसार पोलीस उपनिरीक्षक/विनोद पाटील नेम. गुन्हे शाखा, घटक-३, कल्याण हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा. श्री आशुतोष डुंबरे सो, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, पंजाबराव उगले, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), ठाणे शहर, शिवराज पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), ठाणे शहर, शेखर बागडे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, शोध-१, ठाणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक-३, कल्याणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे, सहा. पो.निरी. संतोष उगलमुगले, पोलीस उपनिरीक्षक विनोद पाटील, पोलीस अमंलदार सहा. पो. उपनिरीक्षक अशोक पवार, विलास कडु, सुधीर कदम, गुरूनाथ जरग, मिथुन राठोड, गोरक्ष शेकडे, सतिश सोनावणे, गोरखनाथ पोटे यांनी केली आहे.

---

# साध्वींना संघातर्फे निरोप

**जालना -** यंदाचा चातुर्मास हा नेहमीच लक्षात राहण्यासारखा आहे. विविध स्पर्धा, ट्रॉफीमुळे तर प्रभावना वाटण्यासाठी लागलेली चढाओढ आणि विशेष करुन जप, तप आणि विविध प्रकारच्या साधनेमुळे हा चातुर्मास प्रत्येकाच्या लक्षात राहील. आज संघातर्फे साध्वींसाठी खास निरोप संभारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित श्रावक आणि श्राविकांनी आप-आपली मते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आभार नेहमीप्रमाणेच संघाचे महामंत्री डॉ. धरमचंद गादिया यांनी केले.

सर्वात शेवटी बोलतांना डॉ. गादिया म्हणाले की, खरे तर या चातुर्मासामध्ये अनेकांचे योगदान राहिले आहे. खुर्च्या पुसणार्यांपासून ते साध्वींच्या गोचरीपर्यंत आणि संघाच्या कर्मचार्यांनी सुध्दा विशेष प्रयत्न केलेले आहेत. या सर्वांच्या योगदानामुळे हा चातुर्मास फलदायी ठरला, असे आपण मानतो. गज्जू काकडेंचा तर आवश्यक उल्लेख त्यांनी यावेळी केला.

---

# दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रावर मिळणार विशेष स्वयंसेवकाची मदत

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी जिल्ह्यात बुधवार दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी मतदान होणार आहे. जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदार संघामध्ये एकुण १ हजार ७५५ मतदान केंद्र आहेत. सदर मतदान केंद्रांवर दिव्यांग मतदारांना ने-आण करण्यासाठी व्हीलचेअर पुरविण्यात आलेल्या असून सर्वच केंद्रावर दिव्यांग मतदारांना मदत करण्यासाठी विशेष दोन स्वयंसेवक नेमले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.


भारत निवडणूक आयोगाकडून दिव्यांग मतदारांना मतदानास प्रोत्साहित करणे, तसेच दिव्यांग मतदारांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण करण्यासाठी 'सक्षम प' तयार केले आहे. जालना जिल्ह्याचे दिव्यांग स्वीप आयकॉन डॉ. निकेश मदारे यांनी विविध उपक्रमांच्या माध्यमातुन जिल्ह्यातील जवळपास ६ हजार दिव्यांग मतदारांना प्रत्यक्ष भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधून त्यांच्यासाठी असलेल्या सोयी-सुविधांची माहिती दिव्यांगापर्यंत पोहोचविली आहे.

सर्व केंद्रांवरती असलेल्या सोयी सुविधांचा आढावा घेत प्रत्येक केंद्रावरती दिव्यांग मतदारांसाठी रॅम्पची सुविधा, पाणी, अल्पदृष्टी मतदारांकरिता मॅग्निफाईन ग्लासेस आणि दृष्टीबाधित मतदारासाठी मशीन वरती ब्रेल लिपी मधील अंक तसेच प्रत्येक मतदाराला ब्रेल लिपी वोटर स्लिप देण्यात येणार असून या संदर्भातील सर्व कार्यवाही समाज कल्याण विभागातील कर्मचारी करीत आहेत. सदर कामी जिल्हाधिकारी कार्यालयात दिव्यांग कक्ष निर्माण करण्यात आला आहे. दिव्यांग नोडल अधिकारी अनंत कदम, दिव्यांग सहायक नोडल अधिकारी अतिश ससाणे यांच्यासह समाज कल्याण विभागातील गणेश अंभोरे, शैलेंद्र कापसे, संदिप कांबळे, संदिप जाधव, हरिदास भोपळे, राहुल तरटे, पोपट मनगटे, इंद्रनिल नाईक व दिव्यांग शाळेतील नियुक्त कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

ज्या दिव्यांग मतदारांनी गृह मतदानासाठी अर्ज केला होता त्या सर्व दिव्यांग मतदारांचे घरी जाऊन सुरक्षित मतदान करून घेण्यात आले आहे. याच सोबत सर्व दिव्यांग मतदारांसाठी सर्वच मतदान केंद्रावरती रांगेतून सूट देण्यात आलेली असून प्रत्येक दिव्यांगाला मतदान केंद्रावरती पोहोचल्यानंतर स्वयंसेवकांच्या मदतीने कुठल्याही रांगेशिवाय मतदान करून घेतले जाईल. दिव्यांग मतदारांना केंद्रस्थानी ठेवून सर्व दिव्यांगांचे शंभर टक्के मतदान करून घेण्यासाठी जालना जिल्हा निवडणूक कार्यालयाकडून प्रयत्न केले जात असून यामध्ये दिव्यांग मतदारांचाही सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. असेही कळविण्यात आले आहे.

---

# राजमाता जिजाऊ शाळेतील विद्यार्थ्यांचे मानवी मनोऱ्याद्वारे मतदारांना आवाहन




**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथील विद्यार्थ्यांनी मानवी साखळी द्वारे मतदाराना मतदान करावे यासाठी मानवी साखळी द्वारे जनजागृती करण्यात आली. याद्वारे मतदारांना आवाहन करण्यात आले की राष्ट्रीय कार्य म्हणून मतदारांनी शंभर टक्के मतदान करावे. महत्त्वपूर्ण अंग म्हणजे निवडणूक. या निवडणुकीमध्ये मतदारांचा हक्क असतो मतदान करणे. त्यासाठी मतदारांना आवाहन करण्यासाठी राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूलच्या शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी मानवी साखळी द्वारे मतदारांना शंभर टक्के मतदान करण्याचे आवाहन केले. असे अनेक सामाजिक उपक्रम राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल राबवत असते. याचाच एक भाग म्हणून या मानवी साखळी द्वारे विद्यार्थ्यांनी मतदारांना हे आवाहन केले आहे. याप्रसंगी उभरंडे सर, अमोल तेलंग्रे, नवाज शेख दत्तात्रय गाडेकर, विमल एस, भागवत लहाने, विनोद धोलिया, बनकर सर, राजपूत सर, वनिता बोडके, रोहिणी सोळुंके, सविता बकाल, स्नेहल रिंढे, सुनिता मोरे, अश्विनी दुनगहू, विमल मदन, केशव पंडितकर, बाळू चव्हाण, अंकुश जोशी इत्यादींची उपस्थिती होती.

---

# तुलसी विवाह चे महात्म्य आजच्या जगातही महत्त्वपूर्ण - विठ्ठल महाराज टेंभुर्णीकर

टटेंभुर्णीतील यांनी तुलसी विवाह चे महत्व या ठिकाणी समजावून सांगितले तुलसी विवाह का करावा प्राचीन काळात जालंधर नावाचा राक्षस चारीकडे खूप उत्पाद करत होता हा राक्षस वीर आणि पराक्रमी होता त्याच्यात सहस असल्याचे कारण होते त्याची पत्नी वृंदा तिचे पातीव्रता धर्म तिच्या प्रभावामुळे तो सर्व व्यापी होता परंतु जालंदराच्या या उपद्रवामुळे त्रस्त देवगन प्रभू श्री विष्णू कडे आले आणि संरक्षणासाठी याचना करू लागले त्याची प्रार्थना ऐकून विष्णू ने रुंदा हिचे पातीव्रत्य धर्मभंग करण्याचा निश्चय केला,

इकडे वृंदाचे सातीत् नष्ट झाल्यामुळे देवतांशी युद्ध करत असताना जालंधराचा मृत्यू झाला वृंदा नाही गोष्ट लक्षात आल्या क्षणी तिने क्रोधित होऊन प्रभू विष्णूंना श्राप दिला की ज्याप्रकारे छळ करून तुम्ही मला पती वियोग दिला आहे त्याचप्रमाणे तुमच्याही पत्नीचा छळपूर्वक वियोग सहन करण्यासाठी तुम्हाला मनुष्य लोकात जन्म असे म्हणत वृंदा पती बरोबर सती गेली आणि त्या जागी तुळशीचे झाड तयार एका इतर प्रसंगाप्रमाणे वृंदाने रागात विष्णूंना शाप दिला माझे सत्व भंग केल्यामुळे तुम्ही दगड व्हाल या दगडाला शालिग्राम म्हणतात तेव्हा विष्णू मानाने हे वृंदा तुझ्या सतीत्वाचे फल म्हणून तू तुळस भरून माझ्यासमोर राहशील माझ्यासोबत तुझा विवाह लावणाऱ्यांना पुण्य लाभेल तेव्हापासून तुळशी विना शालिग्राम किंवा विष्णूची पूजा पूरी मानली जाते शालिग्राम आणि तुळशीचा विवाह प्रभु विष्णू आणि महालक्ष्मीच्या विवाहाचे प्रतितात्मक आहे त्यामुळे सर्वजण विवाह कार्तिक द्वादशी पासून कार्तिक पौर्णिमेपर्यंत लावतात आणि संकल्पसह पूजा करतात की श्रीकृष्ण प्रमाणे पती माझ्या मुलीला पण मिळू दे अशी प्रार्थना करतात तुलसी विवाह ची पूजा घरातील कर्ता पुरुष यांच्या हस्ते केली जाते यावेळेस तुळशी मातेला नवरी प्रमाणे सजवले जाते साडी ओटीचे सामान बोर भाजी आवळा चिंच इत्यादी ठेवले जाते तुळशी वृंदावनावर राधाकृष्ण बोरभाजी आवळा इत्यादी काढले जाते सूर्य चंद्र रुक्मिणी स्वयंवराची पालखी इत्यादी तुळशी वृंदावनाला रंग देऊन गिरणी काढली जातात तुळशी विवाह मुळे एक सात्विक ऊर्जा घरामध्ये निर्माण होते घरामध्ये मंगल बोलले जातात यावेळी आपले इष्ट इश्कबांधव यांना बोलावले जाते बऱ्याच ठिकाणी पूर्वहीत्य करण्यासाठी भटजींना बोलावले जाते काही जण घरगुती विवाह सोहळा पार पाडतात जी उपवर मुले मुली आहेत त्यांच्या लग्नातील अडथळे तुळशी विवाह मुळे दूर होतात या तुळशी विवाहाच्या अक्षदाला सर्वोत्तम चंद्रबल असते त्यामुळे या अक्षदा वधू वरांच्या डोक्यावर टाकल्यास त्यांना उत्तम चंद्र व लाभून त्यांचा विवाह लवकर पार पडतो या यावेळी सर्व काही मोठ्या लग्नाप्रमाणे फटाक्याची आतिषबाजी केली जाते यावर्षी टेंभुर्णी तालुका जाफराबाद परिसरात पुरोहित विठ्ठल महाराज यांनी या तीन दिवसांमध्ये शंभर ते १५0 ठिकाणी लग्नाचे पुरोहित्य केले हिंदू संस्कृती प्रमाणे तुळशी विवाहाला विशेष महत्त्व आहे यानंतर लग्नाच्या तारखा सुरू होत असतात लग्नाची पहिली तारीख १७ नोव्हेंबर आहे तरी सर्वांनी तुळशी विवाह लावावे आणि आपली हिंदू संस्कृती जपावी संकलन पुरोहित विठ्ठल महाराज



जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी डॉ. पांचाळ यांचे आवाहन

# तक्रारीसाठी सीव्हिजील ॲप टोल फ्री क्रमांक १९५० यावर संपर्क साधावा

**जालना । प्रतिनिधी** - जालना जिल्ह्यातील नागरिकांनी आदर्श आचारसंहिता व खर्चाच्या संबधित तक्रारीसाठी सीव्हिजील ॲप तसेच नागरिकांना निवडणूक विषयक काही शंका असल्यास १९५० या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे. सीव्हीजील ॲप आदर्श आचारसंहिता व खर्चाच्या संबधित तक्रारीसाठी सीव्हीजील प हे नागरिकांसाठी आदर्श आचारसंहिता आणि निवडणुकीदरम्यान होणा-या खर्चाच्या उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी एक अभिनव मोबाईल ॲप्लिकेशन आहे. त्यामुळे सदरील पवर विधानसभा परिक्षेत्रातील नागरिकांनी आदर्श आचारसंहिता आणि निवडणुकी दरम्यान होणाऱ्या खर्चाच्या उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी याचा वापर करावा. या ॲपवर नोंदविलेल्या तक्रारीचे निराकरण १०० मिनिटात करण्यात येईल. यावर नागरिक लाऊडस्पीकरच्या आवाजाचे उल्लंघन झाल्यास, अवैध मद्य वाटप व वाहतूक, परवानगी शिवाय बॅनर व पोस्टर लावल्यास, पेड न्युज, फेक न्युज आढळुन आल्यास, प्रलोभन दाखविल्याची तक्रार असल्यास अशा घटनांविरोधात तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांनी या ॲपचा वापर करणे अपेक्षीत आहे. अगदी एका मिनिटांत आपणाला निवडणूक काळात सुरु असलेल्या गैरप्रकाराबददल तक्रार नोंदवता येईल. गैर प्रकाराबाबत फोटो, व्हिडीओ (२ मिनिटांचा) यावर अपलोड करता येईल. तुम्ही पाठविलेल्या माहितीवरुन तक्रारी बाबतचा ठाव ठिकाणा शोधला जाईल. तक्रार केल्यानंतर १०० मिनिटांत निवडणुक आयोगाचे भरारी पथक घटनास्थळी पोहचून तक्रारीचे निवारण करील. विशेष म्हणजे आपण दिलेली माहिती व आपले नाव गोपनीय ठेवले जाईल. नागरिक निनावी तक्रार देखील या ॲपवर नोंदवू शकतात. निवडणूक प्रक्रियेत सुसूत्रता आणि अधिकाधिक मतदारांच्या उपयुक्ततेसाठी भारतीय निवडणूक आयोगाने १९५० ही हेल्पलाईन कार्यान्वित केली आहे. ही हेल्पलाईन २४ तास सुरु असून याद्वारे म तदारांच्या विविध तक्रारींचे निवारण केले जाते. नागरिकांना निवडणुक आणि मतदानासंबंधीची माहिती वेळोवेळी देणे, नवीन मतदार नोंदणी सोबतच मतदारांच्या विविध शंकाबाबत म ार्गदर्शन, मतदान

**पान २ वर**

रोटरी क्लब मिडटाऊनच्यावतीने अन्नामृत सेवाभावी संस्थेला पाच लाखाची देणगी


# अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान- सागर दक्षिणी




**जालना । प्रतिनिधी** - शहरातील बारा हजारावर विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन पुरविणाऱ्या अन्नामृत या सेवाभावी संस्थेला रोटरी क्लब ऑफ जालना मि डटाऊनच्यावतीने रोटरी सदस्य आदित्य बनवारीलाल बगडिया व परिवाराच्यावतीने पाच लाखाची देणगी प्रदान करण्यात आली.

पद्मभूषण स्व. डॉ. बद्रीनारायण बारवाले यांच्या प्रयत्नातून गोल्डन जुबली शाळेच्या परिसरात सव्वा एकर क्षेत्रात अन्नामृत सेवाभावी संस्थेसंस्थेतर्फे मध्यान्ह भोजन हा प्रकल्प राबविण्यात येत असून, शहरातील शेकडो शाळांतील १२ हजारपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना पौष्टिक आणि उच्च प्रतीचे मध्यान्ह भोजन पुरविले जात आहे. या ठिकाणी अत्याधुनिक किचनची (स्वयंपाकघराची) उभारणी करण्यात आलेली असून, रोटरी क्लब मि डटाऊनचे अध्यक्ष सागर दक्षिणी, सचिव गौरव मोदी, सहसचिव सौ. मोनाली भक्कड, सौ. पुनम दक्षिणी, धवल मिश्रीकोटकर, सोनिया मि श्रीकोटकर, प्रतीक नानावटी, डॉ. सुजाता नानावटी यांच्यासह पदाधिकारी व सर्व सदस्यांनी भेट देऊन मध्यान्ह भोजन कार्यक्रमाची माहिती जाणून घेतली. यावेळी रोटरी सदस्य आदित्य बनवारीलाल बगडिया यांनी परिवाराच्यावतीने या संस्थेला पाच लाखाची देणगी प्रदान केली. ते म्हणाले की, सर्वात प्रख्यात भारतीय स्वयंसेवी संस्थांपैकी अन्नमृत ही संस्था आहे. गुणवत्ता राखून विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन पुरविले जात आहे.

अन्नामृतचे गणेश नखाते यांनी सुरू असलेल्या मध्यान्ह भोजन कार्यक्रम आणि अत्याधुनिक स्वयंपाकघराच्या प्रणालीची माहिती दिली. क्लबचे अध्यक्ष सागर दक्षिणी म्हणाले की, अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, अशा कार्यासाठी दिली जाणारी देणगी निश्चितच सार्थकी लागते, त्यातून आत्मि क समाधान लाभते. अन्नामृतने शालेय मध्यान्ह भोजन कार्यक्रम सुरू झाल्यापासून ८ राज्ये आणि २१ शहरांम ध्ये अत्याधुनिक स्वयंपाकघरे उभारली आहेत. या स्वयंपाक घरातील कमालीची स्वच्छता, भोजनाचा उत्कृष्ट दर्जा, नियोजनबद्ध भोजन वितरण प्रणाली सेवाभावी टीममुळे या संस्थेची कीर्ती दूरवर पसरली आहे. त्यामुळे रोटरीसह इतर संस्था अन्नामृतशी जोडण्यासाठी आमचे प्रयत्न राहतील, असे सागर दक्षिणी म्हणाले. शेवटी उपस्थितांचे आभार गौरव मोदी यांनी म ानले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.